**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक : २४/१०/२०२४

## वाडीव-हे शिवारात देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस हस्तगत
## नाशिक ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई - लाखो रुपये किंमतीचा अवैध मद्यसाठा नाश

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दि. १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आज दि. २४/१०/२०२४ रोजी **वाडीव-हे पोलीस ठाणे** हद्दीत मुंबई आग्रा महामार्गावर पाडळी गावचे शिवारात हॉटेल सार्थक नाश्ता पॉईंट याठिकाणी सराईत गुन्हेगार पुरूषोत्तम उर्फ गप्पा हा देशी बनावटीचे पिस्टल कब्जात बाळगुन फिरत असल्याची खात्रीशीर बातमी स्थागुशाचे पथकास मिळाली होती. त्यानुसार पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणावर पाळत ठेवुन सराईत गुन्हेगार नामे **पुरूषोत्तम उर्फ गप्पा संजय गिरी**, वय २०, रा. नांदगाव सदो, ता.इगतपुरी, जि.नाशिक यास ताब्यात घेतले. त्याचे कब्जात **एक देशी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस** मिळुन आले, सदर आरोपी हा विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळुन आला असून त्याचेविरूध्द वाडीव-हे पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हेगार पुरूषोत्तम उर्फ गप्पा गिरी याचेवर यापुर्वी खुन, दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, आर्म ॲक्ट, दुखापत यासारखे गंभीर स्वरूपाचे एकुण ०९ गुन्हे दाखल आहे.

तसेच **सिन्नर पोलीस ठाणे हद्दीत** विनापरवाना बेकायदेशीररित्या धारदार तलवार कब्जात बाळगल्या प्रकरणी इसम नामे **नितेश किसन बिन्नर,** वय २३, रा. एकता नगर, ता.सिन्नर, जि.नाशिक याचेविरूध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २३ व २४ ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत देशी विदेशी मद्याची विक्री व वाहतुक तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे एकुण ३० इसमांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करून ३० गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यात देशी विदेशी मद्य व हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन व साहित्य सामुग्री असा एकुण २,०९,८६०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल नाश / जप्त करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुक सन २०२४ च्या पार्श्वभुमीवर नाशिक जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहुन निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात याकरीता जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.